मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

मप्र

# हितगुज

अंक २९ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च १९९७

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## वर्धापन दिन समारंभ, पुणे

२६-१-१९९७



धनंजय मराठे शास्त्रीय संगीत

'दोघी' चित्रपटातील गीत गाताना अंजली मराठे

आरती मराठे व तिची कलापूर्ण रांगोळी

रेकॉर्ड डान्स - सुरभि व शाल्मली मराठे

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळाच्या सभा**

दर महिन्याच्या दुसऱ्या व गरजेनुसार चौथ्या शनिवारीही प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभा होतात. या सभांच्या वेळा कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी येऊ शकतो. मागील तिमाहीत डिसेंबर १४ व २८, जानेवारी ११ आणि फेब्रुवारी ८ रोजी या सभा झाल्या.

दि. १४-१२-९६ रोजी झालेल्या सभेपासून मुंबईतल्या बालमोहन विद्यामंदिर या मान्यताप्राप्त शाळेतून काही विधायक कामाला वेळ मिळावा म्हणून स्वेच्छानिवृत्त झालेले कुलबांधव शिक्षक सुधाकर नरहरि (पृ. ४६) यांना कार्यकारी मंडळाच्या सभांना निमंत्रित म्हणून नियमितपणे बोलावण्यात येत आहे. प्रतिष्ठानच्या कार्यांत त्यांची मोलाची मदत होत आहे.

दि. ११ जानेवारीची कार्यकारी मंडळाची सभा प्रतिष्ठानच्या कार्यालयात न होता श्री. सुरेशभाऊ (सुरेश सखाराम, पृ. ३९९) यांच्या घरी झाली. या सभेला प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष **गणेश विनायक (पृ. ११५) यांची अमेरिकेत स्थायिक झालेली कॉम्प्युटर तज्ञ कन्या सौ. नीला ज्ञानेंद्रकुमार मयूर** ही आवर्जून कुलबांधवांना भेटण्यासाठी उपस्थित होती. प्रतिष्ठानतर्फे माहेरवाशिणीला अनुरूप असा तिचा सन्मान करण्यात आला.

**हितगुज**

हजार वर्गणीदारांचे उद्दिष्ट पूर्ततेच्या दृष्टीने सभासदवाढ धीमी पण सातत्याने होत आहे. माहेरवाशिणींनी अधिक उत्साहाने वर्गणीदार व्हायला पुढे यावे असे आवाहन आहे. या संदर्भात **भालचंद्र कृष्ण (पृ. ४२७) कोल्हापूर मुलगी सौ. अर्चना अरुण कुळकर्णी** हिचा विशेष उल्लेख करायला हवा. ती हितगुजची वर्गणीदार तर झालीच. पण मराठे कुळाशी घनिष्ठ संबंध रहावा म्हणून रु.११०० देऊन आश्रयदाती सभासदही झाली. अन्य माहेरवाशिणींना तिच्या उदाहरणाने स्फूर्ती मिळेल ना?

हितगुज संवर्धन निधीलाही संथगतीने प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तिमाहीत **सौ. सीमा संजय मुळये, रत्नागिरी (सुरेश पांडुरंग पृ. ३२३ यांची मुलगी)** यांचेकडून हितगुज संवर्धन निधीसाठी रु. १०१ देणगी मिळाली.

**'आदर्श माता' निबंधस्पर्धा पारितोषिके**

हितगुजच्या मागील (डिसेंबर १९९६) अंकात 'आदर्श माता' निबंध स्पर्धा जाहीर करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी सहा निबंध आले. परीक्षणाचे काम माझे मित्र व जुने सहकारी, सुप्रसिध्द वयोवृध्द साहित्यिक श्री. प्रभाकर अत्रे यांनी आनंदाने व अतिशय अल्प काळात करून दिले. खालील स्पर्धकांचे निबंध बक्षिसपात्र ठरले आहेत.

**१. प्रथम पारितोषिक रु. ३००**
**सौ. मीनाक्षी रवींद्र,** (पृ. २२०)
एम. ए., एम. एड.,
आशीर्वाद बंगला, कोतवाल नगर, कर्जत.

**२. द्वितीय पारितोषिक रु. २००**
**श्री. सदानंद प्रभाकर विद्वांस** (पृ. ६५८)
मु. मुद्रे बद्रुक, घ.न. ७४, ता. कर्जत,
जि. रायगड.

**३. तृतीय पारितोषिक रु. १००**
**सौ. वृषाली संजीव चक्रदेव,**
'आदित्य' श्री मयूरेश्वर सोसायटी,
कुळगांव - बदलापूर

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व कुलबांधवांचे आभार. यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन. बक्षिसाची रक्कम त्यांच्या नावे रवाना करण्यांत आली आहे. प्रथम पारितोषिकाचा निबंध या अंकात छापला आहे. अन्य निबंध यथावकाश प्रसिध्द करण्यात येतील. - संपादक.

**वैद्यकीय मदत**

तासगांव (जि. सांगली) येथील कुलबांधव **विष्णु दत्तात्रय चक्रदेव** (पृ. ७३०) यांना रु. १००० वैद्यकीय मदत देण्यात आली.

**शिक्षण निधी**

हितगुज संवर्धन निधीप्रमाणेच शिक्षण निधीलाही कुलबांधवांकडून देणग्या मिळत आहेत. गेल्या तिमाहीत मिळालेल्या देणग्या



Marathe Pratishthan

१.    **श्री. नारायण परशुराम** (पृ. १८),
सिडकोचे अध्यक्ष कल्याण    **रु. ११,०००**

२.    **श्री. विष्णु नारायण** (पृ. ४१७),
बांद्रा, मुंबई (कै. सौ. लीला विष्णू
यांचे स्मरणार्थ)    **रु. २,५००**

३.    **श्री. गजानन चिंतामण** (पृ. १२९),
पुणे (वडिल कै. चिंतामण बळवंत
यांच्या ७५व्या जन्मदिनानिमित्त)    **रु. १०१**

**वर्धापन दिन २६-१-१९९७**

प्रतिष्ठानचा १८वा वर्धापनदिन समारंभ पुणे शाखेच्या पुढाकाराने सालाबादप्रमाणे धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. (वृत्तान्त याच अंकात सविस्तर छापला आहे.) समारंभाचे अध्यक्ष पुण्यातील नामवंत हृदयरोग तज्ञ डॉक्टर ह. वि. सरदेसाई यांना अचानक परगावी जावे लागल्याने पुण्याचे निवृत्त **पोलिस कमिशनर बापुसाहेब (श्रीधर परशुराम पृ. ९८) यांनी अध्यक्षस्थान** स्वीकारले.

**प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ** (सुरेश सखाराम पृ. ३९९) हेही प्रकृतीच्या कारणास्तव कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत. पुणे शाखा प्रमुख अण्णा (वामन आत्माराम - पृ. ३६६) यांना याबाबतच्या पत्रांत ते लिहितात - "माझे स्वतःचे दि. २ जानेवारीला 'प्रोस्टेट ग्लँड'चे ऑपरेशन झाले आहे. त्यामुळे दि. ११ ची मासिक सभा माझ्या घरीच घ्यावी लागली. डॉक्टरनी कोणत्याही लांबच्या प्रवासास न जाण्याचे सुचविले आहे. त्यामुळे २६ला मी हजर राहू शकणार नाही. अतिशय मनापासून इच्छा असूनही उपस्थित राहता येणार नाही याचे वाईट वाटते. आपणासारखे उत्साही कार्यकर्ते असल्यानंतर कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडेल याबद्दल शंका नाही. तरी माझ्यातर्फे सर्व शुभेच्छा."

**अमेरिकेतून भाऊसाहेब** (विनायक गोपाळ - पृ. ६९) **यांनीही या समारंभाला पुढीलप्रमाणे शुभेच्छा पत्र पाठवले आहे-**

"तुम्ही तिघांनी (आण्णा, अरुणराव व सौ. नीलांबरी) आपापले व्यवसाय सांभाळून या वर्षीही 'वर्धापन-दिन' समारंभाचा भव्य बेत आखला आहे त्याबद्दल मराठे परिवार तुम्हाला धन्यवाद देईल. या वर्षीच्या स्लाईड शो कार्यक्रमाविषयी मला कुतूहल आहे. सोहळ्याच्या वेळी आम्हाला प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही तरी त्या समयी आम्ही, आमचे पुत्र, सुना, नातवंडे यांसह मनाने तुमच्या समवेत असू. समारंभाच्या यशस्वीतेसाठी आम्हा सर्वांच्या शुभेच्छा."

**उद्योजक - व्यावसायिकांना मार्गदर्शन**

मराठी कुटुंबातील तरूण पिढीने नोकरीच्या पाशांत गुंतून न राहता उद्योग-व्यवसाय क्षेत्रांत पदार्पण करावे हा प्रतिष्ठानच्या उद्देशांपैकी एक उद्देश आहे. प्रतिष्ठानतर्फे भरविण्यांत येणारे विभागीय मेळावे 'अधिवेशने' अनौपचारिक चर्चा यामध्ये हे विचार आग्रहाने मांडले जातात. आता 'शब्दांपलिकडे' जाण्याच्या दृष्टीने १५-२-१९९७ रोजी मराठे उद्योगभवन येथे उद्योजकांच्या - व्यावसायिकांच्या समस्यांबाबत चर्चा शंकासमाधान व मार्गदर्शनाचा एक कार्यक्रम ठरविण्यांत आला होता. कार्यक्रमाला सुमारे ७०-८० परिवारीय व त्यांचे काही उद्योग व्यावसायिक मित्रही उपस्थित होते.

उद्योग-व्यावसायिकांचे दीपस्तंभ असणारे **ठाणे लघुउद्योजक संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष श्री. मधुसूदन रामकृष्ण खांबेटे** (पृ. ६९५) यांनी सभेला त्यांचे अनुभव सांगितले. उपस्थित उद्योजकांनी विचारलेले प्रश्न आणि सांगितलेल्या अडीअडचणी याबाबत विवेचन करताना त्यांनी सांगितले की उद्योजक हा सतत पुढील ५-१० वर्षांचा विचार करीत असतो; केवळ आज अगर उद्यांवर नजर ठेवून चालत नाही. सध्याची मंदीची परिस्थिती, प्रगत तंत्रज्ञान व जुने कामगार, महागडी वीज, सरकारी कायद्यांची किचकट बंधने, कॉम्प्युटर,


**परीक्षकांचे मनोगत**

'आदर्श माता' या विषयावर मागवण्यात आलेल्या निबंधात स्पर्धकांच्या मनातील आदर्शाच्या व आदर्श मातृत्वाच्या कल्पना जाणून घेण्याचा आयोजकांचा हेतू होता अशी माझी धारणा आहे. परंतु काहींनी तो 'अर्थ' ताणून जिजाऊ व अहिल्याबाई होळकर यांच्यातील आदर्शाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. निबंधाच्या विषयाचा अचूक वेध घेता आला असता तर?

मराठी भाषा दृष्ट्या काही लेख मला फार महत्त्वाचे वाटले. तूर्त इतकेच. स्पर्धकांचे अभिनंदन.

**- प्रभाकर अत्रे, डोंबिवली.**

Marathe Pratishthan



उद्योजकांना मार्गदर्शन करताना (१५.२.९७) मधुसूदन खांबेटे

इंटरनेटसारखी नवनवीन तंत्रे इ. बाबतीत उद्योजकांनी एकत्र येऊन सांघित प्रयत्न करायला हवे. विजेचे दर आपल्या देशांत महाराष्ट्राइतके दुसऱ्या कोणत्याही राज्यांत नाहीत. तसेच इथले पगारमानही अन्य राज्यांच्या मानाने जास्त आहे. त्यामुळे आंध्र, गुजरात, कर्नाटक इ. राज्यांत उद्योगांचे स्थलांतर होत आहे. तिथे छोटे छोटे वीज प्रकल्प होत आहेत. तसेच स्वस्त जमिनीसारखी प्रलोभनेही ती राज्य सरकारे उद्योग-व्यावसायिकांना आकर्षित करण्यासाठी देत आहेत.

हे सर्व संदर्भ ध्यानात घेऊन उद्योजक-व्यावसायिकांनी भावी योजना आखायला हव्या असे त्यांनी सुचविले. तसेच नुकतीच त्यांनी सेनेगलला भेट दिली असतां तिथे भारतातल्या उद्योजकांच्या सहकार्याने उद्योग सुरू करण्यासाठी एक योजना कार्यान्वित करण्याबाबत चर्चा झाल्याचेही त्यांनी सांगितले. २०% भांडवल आमचे व ८०% सेनेगलचे अशी ही योजना असल्याचेही त्यांनी सांगितले.

सुरवातीला प्रास्ताविक करताना **प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊंनी सांगितले** की अशा एका चर्चेतून सर्वच उद्योजक-व्यावसायिकांना त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे शक्य होणार नाही. आजची चर्चा ही उद्योग-व्यावसायिकांना प्रतिष्ठानतर्फे सहाय्य करण्याची सुरवात आहे. यापुढे कोणालाही तांत्रिक, आर्थिक वा अन्य बाबतींत सहाय्य हवे असेल तर त्याबाबत त्यांनी प्रतिष्ठानला विनासंकोच लिहावे. संबंधित क्षेत्रातल्या तज्ञ कुलबांधवांचे सहकार्य - मदत - मार्गदर्शन त्यांना मिळवून देण्यांत येईल.

**ऑक्टोबरमध्ये रत्नागिरीत संमेलन**

मराठे प्रतिष्ठानतर्फे रत्नागिरी येथे **४ व ५ ऑक्टोबर १९९७** रोजी संमेलन भरविण्याचा विचार झाला असून त्याबाबत निश्चित योजना लवकरच प्रसृत केली जाईल. या तारखा कोकणांत जाण्यासाठी राखून ठेवाव्या यासाठी ही पूर्वसूचना. कोकण रेल्वेच्या प्रवासाचा अनोखा अनुभव घेण्याची ही संधी हातची जाऊ द्यायची नाही अशीच सर्व कुलबांधवांची भावना असणार!

**कुलबांधवांचे कलादर्शन - १७ मे १९९७**

विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, जईल, रटाटे व फडणीस या पोटआडनावांसह मराठे कुलबांधवांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम १७ मे १९९७ रोजी सायंकाळी ५॥ ते ८ या वेळांत मराठे उद्योग भवनात आयोजित करण्याचे ठरविण्यांत आले आहे.

कथाकथन, काव्यवाचन, गायन, नकला, वाद्यसंगीत, कंठसंगीत इ. प्रकारचा कोणताही कार्यक्रम यावेळी सादर करू इच्छिणाऱ्या **लहान थोर सर्व वयाच्या कुलबांधव कलाकारांनी** कार्यक्रमाचे संयोजक **श्री. सी. गो. खांबेटे, ए १३-१४, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९ यांचेशी त्वरित संपर्क साधावा.** फोन : ८२०६९९४. ☆

**कुतूहल**

कोकणस्थांची कुळदैवते प्रामुख्याने शंकर-पार्वतीशी संबंधित आहेत. कोकणस्थ मूळ द्राविड शैव असावे का? - **रमेश भिकाजी (पृ.३६५) पुणे**

***वाचकांनी संपादकांना लिहावे.***

Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

**पर्यायी ऊर्जास्त्रोतांचे उद्‌गाते - बाळकृष्ण रामचंद्र**

कोळसा, तेल, गॅस इ. पारंपरिक ऊर्जासाधने फार दिवस पुरणार नाहीत. यासाठी पर्यायी ऊर्जासाधनांचा शोध व प्रसार-प्रचार सध्या चालू आहे. सूर्यशक्ती, पवनशक्ती, बायोगॅस, भूगर्भ (जिओथर्मल), समुद्र इ. चा ऊर्जासाधने म्हणून कसा उपयोग करता येईल त्याचा उहापोह करणारे पुस्तक पुण्यांतील निवृत्त कुलबांधव - **प्रा. बाळकृष्ण रामचंद्र (पृ. ४७६)** यांनी लिहिले आहे. (७३/२/५ लक्ष्मी केशव अपार्टमेंट, एरंडवणा, भक्ती मार्ग, पुणे ४११ ००४.) पुस्तकाचे नाव आहे 'एनर्जी सोअर्सेस-ऑप्शन्स फॉर द फ्युचर.'

फिजिक्स व इलेक्ट्रॉनिक्समध्ये एम. एस्सी., पी. एच्. डी. केल्यानंतर दिल्ली व पिलानी येथील राष्ट्रीय प्रयोगशाळांत नोकरी करून डेप्युटी डायरेक्टर पदावरून 'बा. रा.' निवृत्त झाले. त्यानंतर पुणे विद्यापीठांत प्रोफेसर एमेरिटस म्हणून संशोधन व मार्गदर्शनाचे कार्य चालू ठेवले. पदार्थ विज्ञान शास्त्रांतील ४०चे वर शोधनिबंध प्रसिध्द करणाऱ्या पंच्यात्तरीतील अधिकारी व्यक्तीने लिहिलेल्या या पुस्तकांत त्यांच्या आजवरच्या अनुभवाचे सार सामावले असल्यामुळे त्यांचे पुस्तक निश्चितच मार्गदर्शक ठरेल असा विश्वास बाळगायला प्रत्यवाय नाही.

**९५ नाबाद - वैद्य रामचंद्र शिवराम**

ताराचंद आयुर्वेद रसशाळा, पुणे या मातृसंस्थेतर्फे कै. पुरुषोत्तमशास्त्री नानल वैद्य, संस्थापकांपैकी एक, यांचे स्मरणार्थ रु. ५००० चा पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले.

त्यानुसार द्यावयाचा प्रथम पुरस्कार ९-५-१९९७ रोजी **पुण्यांतील ९५ वर्षांचे वयोवृध्द वैद्य रामचंद्र शिवराम (पृ. ४१)** यांना प्रदान करण्यात आला. त्यांनी पुरस्काराची रक्कम देणगी म्हणून संस्थेला परत दिली. या रकमेचा उपयोग आयुर्वेद संशोधनाकरिता करण्यात यावा अशी इच्छा प्रदर्शित केली. संस्थेने त्यांची इच्छा मान्य केली.

आयुर्वेद रसशाळेमध्ये धन्वंतरीच्या फायबर ग्लासच्या मूर्तीची स्थापनाही त्यांच्या हस्ते करण्यांत आली.

वैद्य रामचंद्र शिवराम (घराणे, पुरळ-कालवी, जन्म १९०२), आयुर्वेद विशारद हे आयुर्वेद रसशाळेचे सेक्रेटरी आणि रसशाळेच्या मुंबईतल्या दुकानाचे व्यवस्थापकही होते. तसेच त्यांनी पुणे आयुर्वेद महाविद्यालयांत प्राध्यापक, ताराचंद आयुर्वेद रुग्णालयाचे सल्लागार आणि 'आयुर्विद्या' मासिकाचे संपादक म्हणूनही काम केले. अन्य मासिकांतही त्यांनी लेखन केले असून औषध दीपिका, श्री खंडोबा महात्म्य, पूज्य विष्णू बळवंत भावे महाराज चरित्र व त्यांचे काव्य, नेत्ररोग इ. ग्रंथांचे संपादनही त्यांनी केले आहे.

**भालाफेक व गोळाफेक पटु हरी कृष्ण**

बेळगांवमधील प्रतिष्ठानचे सदस्य **हरी कृष्ण (पृ. ४२७)** वय वर्षे ७० यांनी वयस्करांच्या बंगलोर येथे झालेल्या १८व्या राज्यस्तरीय स्पर्धेत गोळाफेक व भालाफेक या दोन्ही स्पर्धांत तृतीय क्रमांक मिळविला. कानपूर येथे २७ फेब्रु. ते २ मार्च १९९७ दरम्यान होणाऱ्या १९व्या ऑल इंडिया व्हेट्रन्स ॲथलेटिक चँपियनशिप स्पर्धेत कर्नाटकाच्या संघांतही त्यांचा समावेश झाला आहे.

हरी कृष्ण, जन्म १९२७, यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर कर्नाटक राज्य परिवहन महामंडळात ज्युनियर इंजिनियर म्हणून नोकरी केली. त्यानंतर हुबळी येथे एका खाजगी कंत्राटदाराकडे बांधकाम सुपरवायझर म्हणून केले.

महामंडळात काम करीत असताना आंतर जिल्हा क्रीडा स्पर्धेत त्यांनी गोळाफेकीत पहिले व भालाफेकीत दुसरे बक्षिस मिळविले होते. आता ते बेळगांवमध्ये स्थायिक असून गेली अनेक वर्षे राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वयस्करांच्या स्पर्धांत सातत्याने पारितोषिके मिळवीत आहेत हे हितगुज वाचकांच्या स्मरणात असेलच. यासाठी तरुणांनाही लाजवील अशा उत्साहाने, नियमितपणे ते बेळगांवमध्ये अन्य सहकाऱ्यांबरोबर सराव करीत असतात.

७० वर्षांच्या या 'तरुण' स्पर्धकाकडून शाळा-कॉलेजांतील खेळाडूंना प्रेरणा व मार्गदर्शन लाभो आणि त्यांच्या स्वतःच्या पदकांप्रमाणेच त्यांची शिष्यमालिकाही निर्माण होवो हीच सदिच्छा

**५०व्या वर्षी पी.एच्.डी.-सौ. ललिता रमेश**

१९६७ साली बडोद्याच्या म. सयाजीराव विद्यापीठांतून बी. ए. ची पदवी. १९७१ साली लग्न



Marathe Pratishthan

झाले. १९८३ पर्यंत मुलं व घर सांभाळण्यात गेली. एका मैत्रिणीकडून प्रेरणा घेऊन पुणे विद्यापीठात एम. ए. ला प्रवेश घेतला व १९८५ ला संस्कृत व प्राकृत घेऊन ती परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. तसेच १९८६ ला बी. लिब. ची पदवी आणि १९८७ मध्ये एम. फिल केली.

१९९२ साली प्राकृत विषय प्रमुख व पाली सब्सीडियरी घेऊन पुन्हा एम. ए. केली. त्यातही सर्वप्रथम श्रेणी. त्याच वर्षी पी एच डी चे रजिस्ट्रेशन केले व ९७ ला संस्कृत मध्ये पी एच डी मिळविली.

१९९४ ते १९९६ मध्ये धुळयाला विद्यावर्धिनी महाविद्यालयात प्रो. ची नोकरी केली व सध्या पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत प्राकृत डिक्शनरी प्रॉजेक्टमध्ये एडीटोरियल असिस्टंट म्हणून नोकरी चालू.

**घरसंसार, शिक्षण आणि नोकरी अशा त्रिविध आघाड्या सांभाळूनही प्रथम श्रेणींत यश मिळवणाऱ्या ललिता रमेश (पृ. ३६५)** यांचे कौतुक करावे तेवढे थोडे! त्याची ही कामगिरी अन्य मराठे कुटुंबीयांनाही ज्ञानोपासनेला प्रेरक ठरो एवढीच अपेक्षा.

### आलोक रविंद्र, पुणे

प्रतिष्ठानचे **सभासद रविंद्र वामन (पृ. ३६६) यांचा मुलगा आलोक** (पुणे शाखेचे प्रमुख वामन आत्माराम, उर्फ आण्णा यांचा नातू), सध्या पुण्यांत वास्तुशास्त्राचे कॉलेज शिक्षण घेत आहे. पुण्यांतल्या पाच आर्किटेक्चरच्या कॉलेजांनी आयोजित केलेल्या फनफेअर स्पर्धेत चि. आलोकने 'फेस पेंटिंग' आणि 'कोलाज' या दोन्ही स्पर्धांत प्रथम क्रमांक मिळविला. चि. आलोकचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन आणि यापुढील स्पर्धा-परीक्षांत उज्ज्वल यश लाभो अशी शुभेच्छा.

### नांदा सौख्य भरे

१) प्रतिष्ठानचे **पुण्यातील सभासद शशिकांत गोविंद (पृ. १७३) यांचा पुत्र मनोज** याचा विवाह सूर्यकांत दिगंबर जोशी (शास्त्री) यांची कन्या मयुरी हिच्याशी दि. ६-६-१९९६ रोजी पुण्यात साजरा झाला.

२) पुण्यातील **शशिकांत गजानन (पृ. ४५१) यांचा मुलगा श्रीनिवास** याचा विवाह विजय वामन देशपांडे यांची कन्या स्वाती हिच्याशी ४-१२-१९९६ रोजी संपन्न झाला.

३) बिंबल, गोवा येथील प्रतिष्ठानचे सभासद **परशुराम विष्णु (पृ. ५२१) यांचा भाऊ मिलिंद** याचा विवाह वार्यंगिणी, मये-गोवा येथील कै. नारायण बा. मणेरीकर यांची कन्या सुजाता हिच्याशी दि. ४-२-१९९७ रोजी शिरोडवाडी, मुळगांव, गोवा येथे साजरा झाला.

४) हुबळी येथील **सदानंद कृष्णाजी (पृ. २८५) यांची कन्या वर्षा** हिचा विवाह पुण्यांतील अरविंद आठवले यांचा मुलगा अभिजित याच्याशी दि. ११-२-१९९७ रोजी पुण्यात साजरा झाला.

५) प्रतिष्ठानचे बिंबल, गोवा येथील सभासद **देऊ गोविंद (पृ. ५१५) यांचा मुलगा दीपक** याचा विवाह बिंबल, गोवा येथील कालिदास भालचंद्र जोशी यांची कन्या अस्मिता हिच्याशी दि. १५-२-१९९७ रोजी बिंबल, गोवा येथे साजरा झाला.

६) प्रतिष्ठानचे पुण्यातील सभासद **सुधाकर जनार्दन (पृ. ४५) डॉक्टर ऑफ म्युझिक यांचा मुलगा हेमंत** याचा विवाह दि. १५-२-१९९७ रोजी श्री. ए. एस. शर्मा यांची कन्या वसुमती उर्फ मालती हिच्याशी पुण्यांत संपन्न झाला.

७) कल्याणमधील सभासद **श्री. अनिल वसंत (पृ. ३२९) यांचा मुलगा मनिष** याचा विवाह भक्ती भास्कर केळकर हिच्याशी व **मुलगी मितल** हिचा विवाह अभिजित मुरलीधर जोशी यांच्याशी असे दोन्ही विवाह एकाच दिवशी १५-२-१९९७ रोजी दादर, मुंबई येथे संपन्न झाले.

८) प्रतिष्ठानचे पुण्यातील सभासद **अरविंद गजानन (पृ. ४५१) यांची कन्या विजयालक्ष्मी** हिचा विवाह अरुण भालेराव यांचा मुलगा विजय याच्याशी दि. १६-२-१९९७ रोजी पुण्यांत साजरा झाला.

### सहवेदना

१) प्रतिष्ठानचे आधारस्तंभ, निवृत्त पोलिस कमिशनर, **बापुसाहेब (श्रीधर परशुराम पृ. ९८) यांच्या पत्नी शालिनीबाई** यांचे दि. ३-३-१९९७ रोजी पुणे मुक्कामी अल्पशा आजाराने अचानक निधन झाले. प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या ८-३-१९९७ च्या सभेत त्यांना श्रध्दांजली वाहण्यांत आली व बापुसाहेबांना सांत्वनपत्र लिहिण्यात आले.



Marathe Pratishthan

# १८ व्या वर्धापन समारंभाचा वृत्तान्त

**- रोहित प्रमोद (पृ. ५१३), पुणे**

मराठे प्रतिष्ठानचा १८ वा वर्धापनदिन दिनांक २६ जानेवारी १९९७ रोजी पुण्यात साजरा झाला. या कार्यक्रमात अनेक पुणेकर कुलबांधवांनी व भगिनींनी आपल्या कलेचे प्रदर्शन करून सर्वांची वाहवा मिळविली.

सुरवात करायची तर **कु. आरती मराठे** हिचे कौतुक करूया. समारंभ जिथे पार पडला त्या वेदशास्त्रोत्तेजक सभागृहाबाहेर एक भव्य, सुरेख रांगोळी तिने काढली होती. मूकबधिर असूनही ज्या जिद्दीने या कलेत प्राविण्य मिळवले ते वाखाणण्याजोगेच आहे.

प्रवेशद्वारातून आत येताना सर्वांना तीळगुळ मिळत होता. सुरवातीला **सौ. नीलांबरी मराठे** यांनी आपल्या छोठ्याशा प्रस्ताविकात मराठे प्रतिष्ठानच्या १७ वर्षांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. सर्व शुभकार्यांची सुरवात आपण श्री गणेशाला वंदन करून करतो. त्याप्रमाणे **सौ. अनुराधा मराठे** यांनी 'ॐनमोजी आद्या' हे गीत गायिले. मग कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. **बापूसाहेब मराठे** यांनी दीपप्रज्वलन केले.

यानंतर झाला सत्काराचा कार्यक्रम. यामध्ये प्रतिष्ठानाचे **संस्थापक कार्यवाह 'वा. ग.' व त्यांच्या पत्नी**, प्रतिष्ठानच्या **पुण्यातल्या कार्याचे आधारस्तंभ अरुणराव व त्यांच्या पत्नी**, 'दोघी' या चित्रपटांतल्या पार्श्वगायना बद्दल राज्य व राष्ट्रीय पातळीवरचे पारितोषिक मिळवणारी **कु. अंजली मराठे**, कुलवृत्तांतातील सर्व मराठ्यांची नावे व पत्ते कंप्युटरमध्ये संकलित करण्याचे काम एकाहाती पूर्ण करणारे मुंबईचे **सी. गो. खांबेटे**, यांचा **शाल - श्रीफळ देऊन विशेष सत्कार** करण्यात आला.

कार्यक्रमाच्या पूर्वतयारीपासून तो यशस्वी व्हावा म्हणून आत्मीयतेने काम करणारे सर्व कार्यकर्ते व कलाकार, या सर्वांमागील प्रेरकशक्ती वा. आ. तथा अण्णा, कल्पक संयोजिका व कुशल सूत्रसंचालिका सौ. नीलांबरी व त्यांचे पति रमेश यांचाहि सत्कार करण्यात आला. तसेच कार्यक्रमाचे ८४ वर्षांचे असूनहि तरुण अध्यक्ष श्री. बापुसाहेब मराठे यांचाहि सत्कार करण्यात आला.

या समारंभासाठी श्री. वा. ग. मराठे व श्री. सी. गो. खांबेटे मुंबईहून आले होते. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री. खांबेटे सध्या सर्व मराठे कुटुंबियांची माहिती संगणकावर संकलित करत आहेत. त्यांनी याबद्दल उपस्थितांना माहिती दिली. त्याआधी

---

*सहवेदना - मागील पानावरून ....*

२) दादर, मुंबई येथील कुलबांधव **वसंत भास्कर (पृ. ३२९) यांचे २२-६-१९९६ रोजी** वृध्दापकाळामुळे दु:खद निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. ते मुंबई महापालिकेतून इलेक्ट्रिकल इन्स्पेक्टर म्हणून निवृत्त झाले होते.

३) प्रतिष्ठानचे ठाणे येथील सदस्य **शंकर दामोदर यांचे वडील बंधु वामन दामोदर (पृ. ३७०)** यांचे ७७व्या वर्षी १३-१२-१९९६ रोजी आकस्मिक निधन झाले.

४) अंबरनाथ येथील प्रतिष्ठानचे सदस्य **वासुदेव मोरेश्वर विद्वांस यांच्या मातोश्री श्रीमती आनंदीबाई (पृ. ६४७)** यांचे २२-१२-१९९६ रोजी वयाच्या ९०व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

५) प्रतिष्ठानचे बदलापूर येथील सभासद **विलास रामचंद्र विद्वांस (पृ. ६६४)** यांचे ३०-१२-१९९६ रोजी बदलापूरलाच रेल्वे अपघातात निधन झाले. ते मध्य रेल्वेच्या बोरीबंदर कार्यालयात कॅश ऑफिसमध्ये नोकरीला होते. त्यांचे वय अवघे ४८ वर्षांचे होते. ते अत्यंत मनमिळाऊ, सर्वांशी स्नेहसंबंध जपणारे व धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्यामागे पत्नी व दोन मुली आहेत.

६) चौल (ता. अलिबाग) येथील प्रतिष्ठानचे सदस्य **सुरेश नारायण विद्वांस यांची काकू रमाबाई शंकर विद्वांस (पृ. ६६४)** यांचे भांगरवाडी, लोणावळा येथे १-१-१९९७ रोजी वृध्दापकाळामुळे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले.

**वरील सर्वांच्या कुटुंबीयांच्या दु:खात अखिल मराठे परिवार सहभागी आहे.** ☆



Marathe Pratishthan

**'हितगुज' संपादक श्री. लक्ष्मण मराठे** यांनी 'हितगुज' चा प्रसार करण्यात सर्वजण काय प्रकारे सहाय्य करू शकतील याबद्दल थोडक्यात विवेचन केले.

नंतर आकर्षणाचा भाग असलेले **करमणुकीचे कार्यक्रम** सुरू झाले. प्रारंभी राष्ट्रीय पुरस्कार विजेती **कु. अंजली मराठे हिने सुगम संगीत** सादर केले. 'दोघी' या गाजलेल्या चित्रपटातील ज्या गाण्यासाठी तिला उत्कृष्ट पार्श्वगायिकेचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला ते गाणे तिने सादर केले. गायनातील तिची प्रतिभा पाहून सर्वजण स्तंभित झाले होते.

मग **बापूसाहेबांच्या दोन नाती सुरभी व शाल्मली यांनी रेकॉर्ड डान्स** सादर केला. त्या जुळया बहिणी असून सध्या भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेत आहेत. करमणुकीच्या कार्यक्रमांच्या पहिल्या भागाचा **शेवट धनंजय मराठे याच्या शास्त्रीय गायनाने** झाला. कु. धनंजय संगीत विशारद असून त्याने नुकतीच संगीत अलंकार ही परीक्षा दिली आहे. त्याने पूरीया धनश्री रागातील 'पायलिया झनकार' ही बंदीश व तिच्या जोडीला हमीर रागातील 'विमल अधर' हे नाट्यगीत सादर केले.

यानंतर **श्री. अरविंद मराठे यांनी उत्स्फूर्त मनोगत** केले. त्यांनी सर्व कुलबांधव प्रतिष्ठानच्या कार्यात सहभागी होत नाहीत याबाबतची खंत व्यक्त केली. करमणुकीच्या कार्यक्रमाचा दुसरा भाग सुरेख झाला. **विवेक व राहूल मराठे यांनी slide show** सादर करून सर्वांचीच मने जिंकली.

विवेक मराठे हा एक गिर्यारोहक असून त्याने सह्याद्रि तसेच हिमालयातील अनेक शिखरे व कडे सर केले आहेत. या कार्यक्रमात त्याने ढाकोबा हा कडा जेव्हा सर केला होता तेव्हाच्या slides दाखवल्या. त्याने गिर्यारोहणाबद्दल बरीच माहिती दिली. विवेकचे निवेदन ऐकत व slide पाहत वेळ कसा गेला हे कळलेच नाही. हाच अनुभव राहुलच्या slide show च्या वेळेसही आला. राहुल हा WWF चा कार्यकर्ता आहे. आपल्या कार्यक्रमात त्याने वासोट्याजवळच्या अरण्यात टिपलेले (कॅमेऱ्यात बरं का) विविध पशु पक्षी, कीटक, वनस्पति दाखवल्या. हाही कार्यक्रम मनोरंजक झाला.

कार्यक्रमाचा शेवट **सौ. मंदा देवधर यांच्या पसायदानाने** झाला. **पुण्याचे श्री. लक्ष्मण मराठे (संपादक नव्हे) यांचे मनोगत** कार्यक्रमातील एक उल्लेखनीय बाब होती. प्रतिष्ठानने त्यांच्या पत्नीच्या बायपाससर्जरी साठी दिलेल्या मदतीबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली व प्रतिष्ठानचे आभार मानले.

अशा या सुंदर कार्यक्रमाला दोन गोष्टींचे गालबोट मात्र लागले. कार्यक्रमाचे नियोजित अध्यक्ष डॉ. ह. वि. सरदेसाई अपरिहार्य कारणामुळे येऊ शकले नाहीत व दुसरे म्हणजे पुरेशी पूर्व सूचना देऊनही उपस्थिती कमी होती. पुढच्या कार्यक्रमाच्या वेळेस भरगोस उपस्थिती असेल हीच इच्छा आपण व्यक्त करु या !

***(११वीत शिकणाऱ्या रोहीतने समारंभाचा इतका छान वृत्तान्त केवळ चार दिवसांत लिहून दिल्याबद्दल त्याचे खास कौतुक. - संपादक)***

☆

---

**पाचव्या वर्षी 'झांशी ते मुंबई' एकटीने प्रवास!**

माझा जन्म वसईला कोकणस्थ ब्राम्हणाच्या सुखवस्तू घराण्यात झाला. माझे आजोबा वसईचे प्रतिष्ठित नागरिक - एक समाजसेवक, विष्णुपंत मोरेश्वर मराठे. (पृ. १९०) वयाच्या पाच वर्षापर्यंत मी आई व बापूंच्याबरोबर (बाळकृष्ण विष्णू) नोकरीनिमित्त बापू जिथे जात तिथे जात असे.

मला पाच वर्षे पुरी होत आली. वसईला आजोबांच्याकडे शिकायला जायचे दिवस जवळ आले. मी बापूंबरोबर झाशीजवळ करारी म्हणून एक खेडं होतं तिथे राहत होते. बापूंना रजा मिळेना व मला कोणी सोबत मिळेना. शेवटी बापूंनी तोडगा काढला. त्यांनी मला गाडीत बसवलं. माझ्याजवळ एक लहानसं बोचकं दिलं. उकडलेल्या शेंगा दिल्या. माझ्या डब्यांत जे कोणी बसले होते त्यांना सांगितलं की ही एकटीच प्रवास करते आहे. तिचे आजोबा तिला उतरून घ्यायला येतील. तिच्यावर जरा लक्ष ठेवा.

आजोबांनी मला कुठल्या स्टेशनवर उतरवलं, मला कसं काय ओळखलं हे मला काहीच ठाऊक नाही. आठवतं फक्त एवढचं की, मी वसईला अंगणात माझ्या बोचक्यासह उभी होते. ओटीवरच्या दारात घरातली सर्व मंडळी गर्दी करून उभी होती.

***- मुंबईच्या नगरपाल उषाकिरण***

*(उषा बाळकृष्ण, पृ. १९०)*

*'उषःकाल' या आत्मचारित्रांतून.*



Marathe Pratishthan

# वर्धापन दिन समारंभ २६-१-१९९७ - क्षणचित्रे



१. बापुसाहेबांचा हस्ते दीपप्रज्वलन
२. अरविंद मराठे यांचे मनोगत
३. सी. गो. खांबेटे - सत्काराला उत्तर
४. 'हितगुज'बाबत निवेदन-लक्ष्मण शंकर
५. प्रतिष्ठानचे संस्थापक कार्यवाह 'वा. ग.' यांचा सत्कार-सपत्निक
६. वर्धापन दिन कार्यक्रमाचे आणि प्रतिष्ठानच्या पुण्यांतील कार्याचेही कल्पकतेने संयोजन आणि संचालन करणारे पतिपत्नी रमेश आणि सौ. नीलांबरी.
७,८. पुण्यांतल्या प्रतिष्ठानच्या कार्याचे सुरवातीपासूनचे आधारस्तंभ अरुणराव यांचा सपत्निक सत्कार.
९,१०. पक्षी निरीक्षक राहूल आणि गिर्यारोहक विवेक-स्लाईड शो करतांना.
११. पन्नाशीत पी.एच्.डी. मिळवणाऱ्या सौ. ललिता रमेश.
१२. प्रतिष्ठानच्या पुण्यातील कार्याची प्रेरकशक्ती आण्णा आणि मार्गदर्शक बापुसाहेब - कोण कोणाचा सत्कार करीत आहेत?

Marathe Pratishthan

# लघुउद्योजकांचे दीपस्तंभ - मधुसूदन खांबेटे

*श्री. मधुसूदन उर्फ मधू खांबेटे (पृ.६९५) हे ठाण्यातील औद्योगिक क्षेत्रांतील एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व. त्यांनी कलकत्त्याला परदेशी कंपनीत नोकरी करतानाच स्वत:चा इंजिनिअरिंग उद्योग सुरू केला. नंतर आपल्या मायभूमीत महाराष्ट्रांत यायचे ठरवून ठाण्यात स्वत:च्या उद्योगाची जिद्दीने उभारणी केली.*

*उद्योग स्थापन करून यशस्वी करण्यात ज्या अडचणी आल्या त्यांतून त्यांना लघुउद्योगांची संघटना स्थापन करून अन्य नव्या-जुन्या उद्योजकांना सहाय्य करण्याची प्रेरणा मिळाली. स्वत:च्या घरात ठाणे स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनची स्थापना केली. सुरवातीच्या काळांत स्वखर्चाने असोसिएशनचे पालनपोषण करून ती नावारूपाला आणली. आज या असोसिएशनची परिपूर्ण अशी स्वतंत्र वास्तू याबाबतच्या त्यांच्या कार्याची साक्ष देते. देशाच्या सीमा ओलांडून परदेशांत मराठी माणसाने उद्योगांची स्थापना करावी म्हणून ते आता कार्यरत आहेत.*

*अशा या कर्तबगार उद्योजकाचा परिचय नव्या, होतकरू उद्योजक-व्यावसायिकांना प्रेरक, मार्गदर्शक व आश्वासक वाटेल अशी आशा करतो. - संपादक*

श्री. मधुसूदन खांबेटे यांचा जन्म ३० मे १९३१ रोजी आंजर्ले, हर्षा (ता. रत्नागिरी) येथे झाला. आजोबा भिक्षुकी व शेती करीत. परंतु आंजर्ल्यासारख्या ठिकाणी खेडेगावी परिवार मोठा असल्याने भागणे कठीण जात असे. त्यांच्या वडिलांनी ठाण्याच्या पोस्टात नोकरी धरली. पुढे ती न आवडल्याने, धाडसाने कराचीला गेले आणि तिथे कामाचा अनुभव मिळवला. परंतु तब्येत बिघडल्यामुळे ते कलकत्त्याला आले व बंगवासी झाले.

त्यामुळे मधु खांबेटे यांचे अगदी सुरवातीपासूनचे आयुष्य बंगालमध्ये गेले. गुजराथी लोकवस्ती असलेल्या चाळीत त्यांचे वास्तव्य होते. गुजराथी माध्यमातून प्राथमिक शिक्षण झाले. त्यामुळे त्यांना गुजराथी उत्तम येते. आणि बंगालमध्ये असल्याने उत्तम बंगालीही येते. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी कलकत्त्याला बॉम्ब वर्षाव होत असे. जीवन धोक्यात होते. म्हणून सुमारे सात वर्षे त्यांचे बिऱ्हाड, दोन भाऊ, आई नागपूरला आले. त्यामुळे त्यांचे माध्यमिक शिक्षण मराठी माध्यमातून नागपुरात झाले. कॉलेजच्या शिक्षणासाठी ठाण्याला मामांकडे राहिले. पुढे कलकत्त्याला 'ग्राउंड इंजिनिअरिंगचे' शिक्षण घेतले. परंतु काही कारणाने ते अर्धवट सोडून ते इलेक्ट्रीकल व मेकॅनिकल इंजिनिअर झाले.

### विदेशयात्रा

त्या काळात ज्या इंग्लीश कंपनीत उमेदवारी केली त्या लोकांनी मेहनती स्वभाव व लक्षपूर्वक, उत्तम काम करण्याची हातोटी बघून खांबेटे यांना कायम स्वरूपी नोकरीत सामावून घेतले. पुढे याच कंपनीतर्फे रेल्वेब्रेक्सचे उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांना इंग्लंडला पाठविले गेले. तेथून परत आल्यानंतर त्यांनी उच्चपदावर ७,८ वर्षे काम केले. व पुढे ही नोकरी सोडून पुन्हा महाराष्ट्रात ठाणे येथे धंदा करण्यासाठी म्हणून परत आले. तत्पूर्वी कलकत्त्याला अगदी छोट्या स्वरूपात, फावल्यावेळांत वर्कशॉप चालवून सुमारे चार वर्षांचा व्यावसायिक अनुभव घेतला होता.

### कौटुंबिक स्थिती

श्री. मधुभाऊंचा विवाह ५८ साली झाला. पत्नीचे शिक्षण बी. ए. पर्यंत असून एस. टी. सी, सी. टी. सी. हाहि अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला आहे. त्यांना दोन मुले असून मोठी मुलगा नॅशनल स्कॉलर आहे व जावई आय. आय. टी. मधून बी. टेक झाले आहेत. मधुकाकांचा मुलगा 'मेकॅनिकल इंजिनिअर' असून धंदा संपूर्णपणे तोच पहातो. त्याची पत्नी कॉमर्स ग्रॅज्युएट असून त्याला व्यवसायात मदत करते.

### ठाणे लघुउद्योजक संघटना

ठाण्याला आल्यावर धंदा सुरू करतांना ज्या अनेक अडचणींना सर्वांना सामोरे जावे लागते तसेच त्यांनाहि जावे लागले. अनेक अर्ज, सर्टीफिकेटस्, कागदपत्रांची जमवाजमव, जागा, भांडवल, कामगार सर्वच समस्या पुढे उभ्या होत्या. कोठेही वजन न ठेवल्याने सर्वच कामाला खूपच वेळ लागे व मन नाऊमेद व्हावयाची वेळ येई. तेव्हां या सर्व समस्या सोडविण्यासाठी एखादी संस्था असावी असे वाटले व अक्षरशः चार मित्रमंडळींना समवेत घेऊन स्वतःच्या घरातच ठाणे लघुउद्योजक संघटना ही संस्था सुरू केली.

अनेक वर्षे ही संस्था स्वतःच्या घरांतच चालविली. जागाभाडे, वीज, पाणी, देखभाल, पाहुणचार, वगैरेचा



Marathe Pratishthan

कोणताही खर्च संघटनेस पडू दिला नाही. स्वतःच्या अपत्याप्रमाणेच या संस्थेचे त्यांनी लालनपालन केले.

लघुउद्योजक संघटना सुरू केली तेव्हां हाताच्या बोटावर मोजता येतील एवढी सभासद संख्या होती. आतां ती संख्या अंदाजे १४०० आहे. सध्या निष्णात लोकांचे मार्गदर्शन, झेरॉक्सची सुविधा, टेलेक्स फॅक्स सुविधा, आरोग्य उपचार केन्द्र, कॉम्प्युटर सेंटर, ठाण्यातील उद्योजकांसाठी उत्पादनप्रदर्शन, निरनिराळ्या शाखेतील २०,००० संदर्भ ग्रंथ, मासिके, पाक्षिके वगैरेंनी वाचनालयहि समृद्ध आहे. पूर्णपणे वातानुकूलित अशी कॉन्फरन्स रूम आहे. तेथे स्लाईडस् वगैरे दाखविण्याचीहि सोय आहे. अनेक सेमिनार्सना त्याचा उपयोग होते. याशिवाय प्रशस्त 'अंकोला सभागृह' सर्व सुविधायुक्त असून सुमारे ३०० लोक तेथे बसू शकतात. एक छोटेसे कॅन्टीनही सेवेस उपलब्ध आहे. हळू हळू उद्योजकांना 'टेस्टिंग लॅबोरेटरीहि' उपलब्ध होत आहे.

या व्यतिरिक्त छोट्यां इंडस्ट्रीजसाठी The Chamber Of Small Industries Association (COSIA) ही संस्था आकारास येत आहे. अफ्रिकेतील 'सेनेगल' ह्या देशांत सध्या या संस्थेतर्फे २३ जण भेट देऊन आले व तेथे उद्योग सुरू करण्याच्या प्रक्रियेसहि नुकतीच सुरवात झाली आहे.

श्री. खांबेटे ६६ वर्षांचे असून नियमितपणे पहाटे चार वाजता उठणे, व्यायाम, देवपूजा, फिरणे व साधा आहार ह्यामुळे त्यांची तब्येत उत्तम आहे. आयुर्वेद, होमिओपथी याचा वापर व अभ्यास घरांत सतत असतो. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील कोणासही डॉक्टरांचा सल्ला घेण्याची आवश्यकता भासत नाही. त्यामुळे दिवसभर कामेही निर्विघ्नपणे पार पडतात. रात्री ८.३० - ९ ला आपोआपच झोप येते. गाढ. त्यामुळे दुसऱ्या दिवशी उत्साहाने कामास प्रारंभ होतो.

"हे एक सेवाव्रतच आहे. मी जोपर्यंत या जागी आहे तो पर्यंत उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही. अशा आचरणानेच वागण्याचा कृतिनिश्चय आहे. त्यामुळे परमेश्वर माझ्या हातून हे कार्य करवून घेतो आहे असा विश्वास आहे." असे श्री. खांबेटे नम्रपणे सांगतात. परमेश्वर त्यांची ही मनोकामना पूर्ण करो हीच मंगल प्रार्थना.

*(- 'आम्ही असे घडलो' या दिवाळी अंकातून)*

---

**निबंध स्पर्धेतील प्रथम पारितोषिकाचा निबंध**

# आदर्श माता

**- सौ. मीनाक्षी रवींद्र** (पृ. २२०), कर्जत

'मातृदेवो भव' ही आपली संस्कृती आहे. 'माता' या शब्दात प्रेम, ममता, कारुण्य, दया इ. सर्व भावनांचा संगम झालेला दिसून येतो. 'घार हिंडते आकाशी चित्त तिचे बाळापाशी'. त्याप्रमाणे माता काहीही कामात असली तरी तिचे लक्ष तिच्या बाळापाशी असते. माता आपल्या मुलांवर माया करते. पण त्याच्या बदल्यात तिला मुलांकडून काही अपेक्षा नसते.

आपल्या मुलावर किंवा मुलीवर संस्कार करणारी पहिली व्यक्ती माता असते. इतकेच काय पण मातेच्या पोटात असतानाच मुलावर मातेचे संस्कार घडतात. अभिमन्यु आईच्या पोटात असतानाच चक्रव्यूहाचा भेद कसा करायचा व आत कसे शिरायचे ते शिकला पण आई झोपी गेल्यामुळे पुढचे काही शिकला नाही. त्यामुळे चक्रव्यूहात तो गेला पण त्याला बाहेर येता आले नाही. म्हणून आपल्या मुलाला जन्म देताना मातेने जागृत राहणे महत्त्वाचे आहे. मातेने गर्भावस्थेतच त्याच्यावर चांगल्या वर्तणुकीने संस्कार केले पाहिजेत.

कोणत्याही मातेला आपला मुलगा चोर, लुटारू, दरोडेखोर व्हावा असे वाटत नाही, तर तो चांगला व्हावा, शिकावा, मोठा व्हावा, आई-वडील, गुरू व समाजाचे ऋण त्याने फेडावे असेच वाटते. पण नुसते वाटून उपयोग नाही. तर त्यासाठी मातेने मुलावर चांगले संस्कार करून त्याला घडवले पाहिजे.

'पुत्र व्हावा ऐसा गुंडा त्याचा तिन्ही लोकी झेंडा' असे म्हणतात. पण असा पुत्र आपोआप घडत नाही त्याला घडवावे लागते. 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही' हे खरे आहे. कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देतो, ठोकून ठोकून टणक बनवतो, त्यावर सुंदर नक्षी काढून त्याला नटवतो. पण ज्यावेळी कुंभार एका हाताने ठोकतो त्याचवेळी दुसऱ्या हाताने गोंजारतो. तसेच मातेने मुलाला धाक दिला पाहिजे. त्याचबरोबर गोंजारलेही पाहिजे.



Marathi Pratishthan

**आदर्श माता पारितोषिकासाठी**
**निकष व नांवे सुचवा**

मराठे प्रतिष्ठानच्या माध्यमातून कर्तृत्ववान, आदर्श अशा आईला रु. १००० चे पारितोषिक प्रतिवर्षी आपल्या आईच्या नावाने द्यावयाची एका कुलबांधवांची इच्छा आहे. आपली आई या पारितोषिकाला पात्र आहे असे वाटणाऱ्या मुलांनी वा मुलींनी स्वत:ची व आईची माहिती द्यावी आणि पारितोषिक आपल्या आईलाच का मिळावे तेहि कळवावे.

आपल्या परिचयातल्या एखाद्या आदर्श मातेला हे पारितोषिक मिळणे योग्य होईल असे वाटणाऱ्या मुला-मुलींव्यतिरिक्त अन्य व्यक्तींनीहि स्वत:च्या पत्त्यासह आदर्श मातेच्या कर्तृत्वाबद्दल लिहावे.

पारितोषिकासाठी पात्र माता ही सासर व माहेरची **मराठे कुळातलीच असली पाहिजे असे बंधन नाही,** मात्र ती आदर्श माता असावी. तिचे कर्तृत्व सिध्द झालेले असावे एवढी एकच अट.

वाचकांनी याबाबतचे प्रस्ताव संपादक हितगुज, यांजकडे ऑगस्ट १९९७ अखेरपर्यंत पाठवावे.

तसेच आदर्श मातेची निवड करण्यासाठी **काय नेमके निकष असावे** याबाबतहि कुलबांधवांनी **३० जून १९९७ पर्यंत संपादक हितगुज यांना लिहावे.**

आदर्श मातेने हे लक्षात ठेवले पाहिजे की, 'मूल' हे परमेश्वराची एक स्वतंत्र कलाकृती आहे. त्यामुळे त्याला स्वत:ची अशी स्वतंत्र, स्वयंसिध्द बनवणारी प्रज्ञा आहे. जर कुठे वजाबाकी असेल तर कुठे बेरीज नक्कीच असणार हे कायम लक्षात ठेवून त्याच्या गुणदोषांचे सातत्याने निरीक्षण केले पाहिजे व योग्य तेथे मार्गदर्शन केले पाहिजे. लहानपणीच स्वावलंबन व सहकार्य यांचे बाळकडू पाजले पाहिजे. स्वत:च्या आचरणातून ते दाखवून दिले पाहिजे.

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. मुलगा किंवा मुलगी पहिलीत गेल्यापासून त्यांच्या अभ्यासावर बारकाईने लक्ष दिले पाहिजे. चांगले मार्क मिळाले पाहिजेत याची जाणीव दिली पाहिजे. जरूर तेथे बक्षिस, प्रलोभन, शाबासकी यांचा उपयोग केला पाहिजे. त्यासाठी काही वेळा गोड बोलून, काही वेळा रागावून, काही वेळी मौन पाळून मुलांना चांगले वागायला शिकवले पाहिजे.

लहान वयात आदर्श व्यक्तींची चरित्रे, रामायण-महाभारतातील गोष्टी, उत्तम लेखकांच्या कथा इ. अवांतर वाचन करण्यास मातेने प्रोत्साहन दिले पाहिजे. स्पर्धा परीक्षा, स्कॉलरशिप परीक्षा, इतर विषयांच्या परीक्षा इ. साठी तयारी करून सदर परीक्षांना बसवले पाहिजे. त्यामुळे अभ्यासातील पाया पक्का होऊन पुढील शिक्षणात त्याचा उपयोग होतो. मातेने मुलाच्या अंगच्या विशेष कलागुणांना वाव देऊन त्यातूनच उत्तम चित्रकार, उत्तम गायक, उत्तम क्रिकेटिअर निर्माण केला पाहिजे.

आदर्श मातेने आपल्या मुलाला स्वत:च्या पंखाने भराऱ्या मारायला शिकवले पाहिजे. मुलाला स्वावलंबी बनवले पाहिजे. स्वत:ची कामे स्वत: करणे, स्वत:चा अभ्यास स्वत: करणे, स्वत:चा निर्णय स्वत: घेणे व जरी ते चुकले तरी त्याच्या परिणामांना धैर्याने तोंड द्यायला शिकवले पाहिजे.

आदर्श माता आपल्या मुलांमध्ये भेद करणार नाही. मुलगा-मुलगी असाही भेद करणार नाही. दोघांनाही समान संधी मिळवून देईल. आदर्श माता आपल्या गरीबीची झळ मुलांपर्यंत पोचू देणार नाही. धन्य ती माता! जी आपल्या मतिमंद मुलाचा, अपंग मुलाचा प्रेमाने सांभाळ करते. 'कुपुत्रः जायते क्वचिद्पि कुमाता न भवति।' हेच खरे.

शेवटी असे म्हणावेसे वाटते की एक बाई शिकली तर सारे कुटुंब शिकते. सर्व कुटुंबे शिकली तर राष्ट्र मोठे होते. तद्वतच **माता आदर्श असेल तर कुटुंब आदर्श होईल व त्यातूनच राष्ट्र आदर्श बनेल.**

☆

**खुषीपत्र : घराबाहेरची दाद**

"आपले 'हितगुज' अंक पुण्याचे डॉ. एच. व्ही. सरदेसाई यांच्याकडे वाचणेत आले. आपण चालू परिस्थितीतील विषयांवर साधक बाधक चर्चेचा उहापोह करता हे वाचून बरे वाटले. अंकाची वार्षिक वर्गणी किती आहे ते कृपया उलट टपाली कळवावे."

- **वसंत पी. मोटे,** पाटण, सातारा.

Marathe Pratishthan

# इलेक्ट्रोलिसीस - थर्मोलिसीस

- **सौ. सुनिता राजन** (पृ. ५१३), स्वरूप ब्युटी पार्लर, पुणे (फोन ६२१००४)

७/८ वर्षांपूर्वीची गोष्ट. तेव्हा मी नुकतीच लंडनहून प्रशिक्षित होऊन आले होते. गणपतीचे दिवस होते. त्यामुळे पुण्याला गल्ली बोळातून गणपती पहाण्यासाठी गर्दी होत होती. जवळपासच्या खेड्यातून व तालुक्यातून लोकांचा लोंढा गणपती पहाण्यास येत होता.

मी दुपारी पार्लरमध्ये फेशियल करत होते. वर्तमानपत्रातून व मासिकातून माझे तोवर बरेच लेख 'इलेक्ट्रोलिसीस' वरती प्रसिध्द झाले होते. एक खेडून जोडपे त्यांच्या नवीनच लग्न झालेल्या मुलीला घेऊन पार्लरमध्ये शिरले.

'या भाऊ, या ताई' म्हणत आश्वासक स्वराने मी त्यांना आत बोलावले. बोलावे की नाही या संभ्रमात शेवटी त्यांनी सांगून टाकले की बाई असे असे झालेय, आम्हाला तुमची मदत हवीय!

मी त्यांनी सविस्तर विचारले तेव्हा कळले की त्यांच्या नवीन लग्न झालेल्या मुलीला तिच्या सासरच्या लोकांनी टाकले आहे व त्याचे कारण आहे तिच्या चेहऱ्यावर, छातीवर व कमरेच्या खाली माकडहाडावर जाड जाड केस आहेत.

लग्नापूर्वीही त्या मुलीच्या अंगावर केस होतेच. परंतु त्याचा एवढा मोठा प्रॉब्लेम उभा राहील याची जाणीव नसल्याने त्यांनी तिकडे लक्ष दिले नव्हते व आता त्यांना माझी मदत हवी होती. कुणीतरी माझा लेख वाचून त्यांना माझ्याकडे पाठवले होते.

त्यामुळे त्यांना प्रथम ट्रिटमेंटबद्दल सर्व माहिती मी सांगितली. ती आता तुम्हालाही सांगते. कारण या ट्रिटमेंटबद्दल बरेच समज-गैरसमज समाजात आहेत. कित्येकांना पूर्ण माहिती नाही, खर्चाचा अंदाज नाही, रिझाल्टबद्दलही उत्सुकता आहेच.

साध्या सोप्या शब्दात सांगायचे तर केसांच्या मुळाशी सुईच्या सहाय्याने इलेक्ट्रीकचा करंट सोडला जातो. त्यामुळे तेथे निर्माण होणाऱ्या उष्णतेने केसाचे मूळ जाळले जाते व त्या ठिकाणी परत केस येत नाही. आलाच तर तो अत्यंत वीक किंवा निःशक्त येतो. हळु हळु केस पूर्ण नष्ट होतो. म्हणजे ही ट्रिटमेंट एक प्रकारे पॅरामेडीकल ट्रिटमेंटमध्ये मोडते. त्यामुळे याचा शास्त्रीय अभ्यास व भरपूर सराव अतिशय आवश्यक असतो.

मनुष्याच्या अंगावरचे केस हे तर खरे पाहता संरक्षणच आहे. उदा. डोक्यावरचे केस - डोक्याचे सूर्याच्या उष्णतेपासून रक्षण करणे हे त्याचे काम! पापणीचे केस - डोळ्याचे संरक्षण करणे. वगैरे ...

परंतु सौंदर्याला बाधा आणणाऱ्या किंवा नको त्या ठिकाणी असणाऱ्या केसांबाबत मात्र जागरूक राहून काही उपाय करणे आवश्यक बनते. उदा. काही स्त्रियांना पुरुषांसारखी दाढी येते व समाजात मिसळताना त्यांना अतिशय लाजिरवाणे वाटते. त्या आपला आत्मविश्वास गमावून बसतात. अशावेळी आमची ट्रिटमेंट त्यांना वरदानच ठरते. ट्रिटमेंट दोन प्रकारची असते.

१) इलेक्ट्रोलिसीस : पूर्वी केसाच्या मुळाशी गॅलव्हानिक करंट सोडला जात असे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या केमिकल ॲक्शनने केस नष्ट होत असे. परंतु त्याला फार वेळ लागत असे.

२) थर्मोलिसीस : सध्या केसाच्या मुळाशी इलेक्ट्रिक करंट सोडला जातो व त्याच्या उष्णतेने केस नष्ट केला जातो. याचा परिणाम लवकर होतो.

**खुषीपत्र :**

**वाचनीय आणि दर्शनीयही 'हितगुज'**

"डिसेंबर ९६चा अंक २८वा असल्याची नोंद घेताना आश्चर्ययुक्त समाधान वाटले. आसन्नमरण युवकाला योग्य डॉक्टर मिळून तो खडखडीत बरा व्हावा आणि अपेक्षेपेक्षा अधिक कार्यक्षम व्हावा, असे काहीसे वाटले.

हितगुज वाचनीय होण्याबरोबरच आता दर्शनीयही होऊ लागला तर! एकेकाळी हितगुज हा एकतर्फी प्रवास असायचा. आता तो परस्पर संवादाचे माध्यम होत आहे ही एक उत्साहवर्धक घटना आहे."

- **विनायक गोपाळ** (पृ. ६९) सनीव्हेल, अमेरिका.

Marathe Pratishthan

परंतु कोणत्याही परिस्थितीत एका सिटींगमध्ये केस कायमचा नष्ट केला जात नाही. कारण केसांच्या वाढीची एक सायकल असते. केस वाढून तो त्वचेच्या बाहेर येण्यास साधारण १३ आठवडे म्हणजे तीन साडेतीन महिने लागतात. त्यामुळे त्वचेवर दिसणाऱ्या केसांना जरी ट्रिटमेंट दिली तरी त्वचेच्या आतील वाढीच्या अवस्थेत असणारे सर्व केस ट्रिटमेंट मिळून नष्ट होण्यास साधारण १ वर्ष लागते. १ वर्ष नियमित ट्रिटमेंट घेतल्यावर केसांच्या संख्येत झालेला बदल नजरेत भरण्याइतका असतो व त्यामुळे स्त्रिया व मुलींचा आत्मविश्वास प्रचंड वाढतो. समाजात फिरणे त्यांना पूर्वीइतके जड जात नाही.

अर्थात प्रत्येक ट्रिटमेंटला लागणारा वेळ हा केसांच्या संख्येवर अवलंबून असतो. त्यामुळे अमुक इतक्या दिवसातच केस नष्ट होतील असे सांगता येत नाही. परंतु प्रथम जरी वरचेवर ट्रिटमेंट म्हणजे महिन्यातून १ वेळा वगैरे घेतली तरी नंतर नंतर वर्षातून १ वेळा ट्रिटमेंट घेतली तरी पुरते व हळु हळु केस कायमचा नष्ट होऊन सौंदर्यात वृध्दी होते. काही वेळा हे केस हार्मोन्सच्या बदलामुळेही येतात किंवा अनुवांशिकतेमुळेही हे होते.

वरती सांगितलेल्या खेडून मुलीच्या संदर्भात मी तिच्या सासरच्या माणसांना भेटले व त्यांना हे समजावून दिल्यावर ते ट्रिटमेंटसाठी तयार झाले. परंतु त्या मुलीचे केस नष्ट होण्यास ५ वर्षे लागली. कारण तिला त्याचवेळी हार्मोन्सची ट्रिटमेंटही दिली. नाहीतर कदाचित ८/१० वर्षे लागली असती.

केसांच्या संख्येनुसार, साधारण १५ मिनिटे ते १ तासपर्यंत ट्रिटमेंट दिली जाते. त्यावेळी मुंगी चावल्याइतपत वेदना होतात व रु. ५० ते २०० पर्यंत प्रत्येक वेळी खर्च येतो. ☆

---

**बालक आणि पालक - ५**

# मुलांसाठी फुरसद काढणे - मानसिक गरज

- **सौ. नीलांबरी रमेश** (पृ. २८०), मानसतज्ञ, पुणे (फोन ४५६२७०)

आजकाल आपल्या समाजात प्रामुख्याने विभक्त कुटुंब पध्दती नांदताना दिसते. दिवसेंदिवस आजी-आजोबांचा सहवासही दुर्मिळ होत चालला आहे. आईवडील तर नोकरीनिमित्त घराबाहेर असतात. घर व नोकरी अशी तारेवरची कसरत करताना त्यांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही.

पण फक्त वेळ नाही एवढं म्हणून भागणार आहे का? अहो, पालकांनी मुलांसाठी वेळ देणं ही तर त्यांची (मुलाची) मानसिक गरज आहे. सबब इतर नित्यकर्माप्रमाणेच मुलांसाठी वेळ देणं हेही नित्यकर्मच मानले पाहिजे.

ज्याप्रमाणे झाडाची मुळं ओलाव्याच्या शोधात असतात त्याप्रमाणेच मुलं निरपेक्ष प्रेम, माया आणि सुरक्षिततेच्या शोधात असतात. खूप पैसा खर्च करणे आणि सर्व प्रकारचे हट्ट पुरवून वस्तू विकत आणून देणे म्हणजे मुलांवर प्रेमाचा वर्षाव करणे अशी बहुसंख्य पालकांची (गैर) समजूत असते. त्यामुळे आजकाल बऱ्याच पालकांना मुलांसाठी वेळ देण्यापेक्षा पैसे किंवा वस्तू देणे अधिक सोपे वाटते. 'पैसे स्वस्त आणि वेळ महाग' अशी आजची अवस्था झाली आहे. परंतु मुलांची अपेक्षा वेगळीच असते. त्यांना वस्तूच्या जोडीला आणखी काही हवे असते. ते म्हणजे आईबाबांचे सानिध्य!

लहान मुलांना आईबाबांचा सहवास प्राणवायू इतका महत्त्वाचा वाटतो. आपण कोणाच्या तरी सहवासात आहोत ही भावनाच मुलांच्या जीवनात सुरक्षितता निर्माण करते. आईबाबांचा सहवास मिळावा, त्यांनी आपल्याला कुरवाळावे, आपण त्यांच्या अंगाखांद्यावर बागडावे, त्यांच्याबरोबर खेळावे असे बालमनाला वाटत असते. मुलं आणि आईवडील यांच्यात सुदृढ व निरोगी नात्याचं बंधन तयार झालं म्हणजे मुलांना सुरक्षित वाटतं.

परंतु यासारखे वातावरण जर मुलाला मिळाले नाही तर अशी मुले भित्री होतात. त्यांना नेहमी असुरक्षित वाटतं, त्यांच्यात मानसिक ताण आणि न्यूनगंड निर्माण होतो, आत्मविश्वास वाटत नाही. असे होऊ नये म्हणून मुलांनी पालकांशी मनमोकळेपणाने बोलले पाहिजे. मुलं आपल्याशी मोकळेपणानं बोलावी असे वाटत असेल तर त्यांच म्हणणं ऐकायला आपण तयार असले पाहिजे. त्यांना मान दिला पाहिजे. याकरिता रात्रीचे

Marathe Pratishthan

जेवण तरी खेळीमेळीने एकत्र, गप्पा मारता मारता केले म्हणजे त्यातून सुसंवाद साधण्यास मदत होईल.

मुलं शाळेत, बसमध्ये, रिक्षामध्ये मित्रांबरोबर किंवा रस्त्याने चालत जाताना रोज विविध प्रकारचे अनुभव घेत असतात. शाळेतील कार्यक्रमांमधूनही अनेक गोष्टी शिकत असतात. त्यातील सगळे बरेवाईट अनुभव कधी एकदा आईबाबांना सांगेन असे मुलांना होऊन जाते. त्यामुळे मुलगा जेव्हा उत्सुकतेने आईबाबांना काही सांगायला येतो तेव्हा त्याचे सांगणे मनापासून लक्ष देऊन ऐकले पाहिजे. त्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव, हातवारे, आवाजाची तीव्रता यावरून त्याच्या बोलण्यातला आशय लक्षात घेतला पाहिजे आणि त्याला प्रतिसाद देऊन त्याच्या बालविश्वात सहभागी झाले पाहिजे. आईबाबांनी आपल्याशी बोलावे, आपली सुखदु:खे, भाव-भावना जाणून घ्याव्या असे मुलांना वाटत असते. त्यामुळे Love is caring and sharing याची पालकांनी जाण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

पण काही वेळेस दिवसभराच्या श्रमाने कंटाळून घरी परतलेल्या आईबाबांना कामे उरकून केव्हा एकदा पाठ टेकतो असे झालेले असते. मुलगा उत्साहाने आईबाबांना काही सांगायला गेला आणि पालकांनी 'आता नको मी दमलोय' असे म्हटले तर मुलांचा हिरमोड होतो. मूल बोलत असतांना त्याच्या बोलण्याकडे तुमचे लक्ष नाही असे जर मुलाच्या लक्षात आले तर त्याला वाईट वाटते. त्यातूनच आईबाबा आपल्याकडे लक्ष देत नाहीत तर आपणही त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायचे अशी मनोवृत्ती तयार होते. त्यातून मुलांच्या बेशिस्तीचे प्रश्न उद्भवतात.

मुले व पालक यांच्यातील दुरावा कमी होऊन जवळीक साधण्यासाठी त्यांच्याशी मोकळेपणाने बोलणे आवश्यक आहे. आईबाबांनी आपल्या लहानपणीच्या गमती मुलांना सांगाव्या. आईबाबा आपल्यासारखेच खोडकर होते, खूप मस्ती करायचे, बोलणी खायचे, खूप खेळायचे, शिक्षक त्यांना रागवायचे, आईबाबा शिक्षा करायचे हे सगळं ऐकायला मुलांना खूप आवडते.

म्हणूनच **पालकांनी मुलांना कुठे तरी अडकवून टाकण्यापेक्षा स्वत:ला रोज थोडा वेळ मुलांबरोबर अडकवून टाकावे** म्हणजे आपल्या मुलांमध्ये जे नाही ते निर्माण करायचे आणि जे आहे ते अधिकाधिक फुलवायचे यासाठी प्रयत्न करता येईल. ☆


॥ श्री स्वामी समर्थ ॥

**त्रिमूर्ती ट्रेडींग कार्पोरेशन**

**फलोद्धारभूत उत्पादनांचे प्रमुख वितरक**
(कोकण/महाबळेश्वर)

जॅम्स, सिरप्स, पल्प, मध, पीठ, आमचुर पावडर, आंबावडी, तसेच सिजनल - आंबापोळी, फणसपोळी, तळलेले गरे इत्यादी.

**कॅरॉनिक्स बायोटॉनीक 'अे' (आयुर्वेदिक गोळ्या)**
एक विश्वव्यापी आरोग्य प्रवर्तक वनस्पतीजन्य रसायन सर्व तऱ्हेच्या फळे, फुले, भाज्या, धान्य, बी-बियाणे वगैरे करिता सर्वश्रेष्ठ किमयागार औषधी. कृत्रिम अथवा मानव निर्मित रासायनिक किटकनाशक विरहित.

**-: रजिस्टर्ड ऑफिस :-**
२ अे, सोमण बिल्डिंग, खो. नं. ४, तळमजला, डॉ. भालेराव मार्ग, गिरगांव, मुंबई-४००००४.
टे. नं. ३८५७३७४ फॅक्स ०२२-३८५९४५४

**-: मार्केटिंग ऑफिस :-**
द्वारा गिरगांव पंच डेपो प्रा. लि.
१३०, जगन्नाथ शंकरशेठ रोड, गिरगांव, मुंबई-४.
टे. नं. ३८२५९८०.



**२७ वर्षांपूर्वी आयात पर्याय पारितोषिक विजेते 'स्विफ्ट' आता निर्यातीसाठी सज्ज**



*जागतिक बाजारपेठ मिळविण्यासाठी अमेरिकन तंत्रज्ञानाने बनविलेले 'स्विफ्ट-मल्टीलिथ १२५०' ऑफसेट प्रिंटींग मशीन*

**स्विफ्ट्स लिमिटेड**

**मराठे उद्योग भवन,** आप्पासाहेब मराठे मार्ग, मुंबई-२५.




Marathe Pratishthan

# मॉडेल स्कुल सप्लायर्स - पुणे

**यांची कोल्हापूर शाखा**

## 'मराठे शैक्षणिक साहित्य वितरण'

बालवाडी साधने, काचफळे, क्रिडा साहित्य,
नकाशे, तक्ते, शैक्षणिक साहित्य,
यांचे उत्पादक व वितरक

---

**: कोल्हापूर शाखा :**
२९४६, ए वॉर्ड, कपिलतिर्थ मार्केट (पूर्व बाजू),
पोतदार ज्वेलर्स शेजारी, कोल्हापूर.

---

**: मुख्य ऑफिस :**
पाप्युलर हाऊस, ६३८, नारायण पेठ, नातू हौद
समोर, एन. सी. केळकर रोड, पुणे-४११०३०.
फोन : (०२१२) ४५१३०४ (रेसिडेन्स)


## या अंकात


१. वर्धापनदिन समारंभ-क्षणचित्रे ........... पृ.१,९
२. १८व्या वर्धापन समारंभाचा वृत्तांत .......... पृ.७
३. पाचव्या वर्षी झाशी ते मुंबई
एकटीने प्रवास! ............................. पृ.८
मुंबईच्या नगरपाल उषाकिरण
४. लघुउद्योजकांचे दीपस्तंभ-मधुसूदन खांबेटे .... पृ.१०
५. आदर्श माता-प्रथम पारितोषिकाचा निबंध .. पृ.११
६. आदर्श माता पारितोषिकासाठी
निकष व नावे सुचवा ........................ पृ.१२
७. इलेक्ट्रोलिसीस-थर्मोलिसीस ............... पृ.१३
सौ. सुमित्रा सजन, ब्युटीपार्लर व्यवसाय तज्ञ
८. मुलांसाठी फुरसद काढणे ................... पृ.१४
सौ. नीलांबरी रमेश यांचा, बालक
आणि पालक' मालिकेतला लेख

याशिवाय प्रतिष्ठान वृत्त (पृ.२-४), सभासद वृत्त
(पृ.५-७), खुशीपत्रे (पृ.१२,१३) व नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

प्रति

433 91-049 2564 457 K-0332 22RH
SR. VASUDEV MORESHWAR MARATHE
KEDAR CHHAYA, SAHAKARNAGAR,
KRISHNARAO DESAI COLONY,
SATARA 415002


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan